# प्रेसनोट

नाशिक,
दि. ०५/०८/२०२३

**आलोसे नरेशकुमार तुकाराम बहिरम, तहसिलदार, नाशिक यांनी १५,००,०००/- रुपये लाचेची रक्कम स्विकारल्याने त्यांचे विरुध्द भ्रष्टाचार प्रतिबंध कायद्यान्वये कारवाई केले बाबत.**

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक | नाशिक |
| गुन्हा नोंद क्रमांक | कार्यवाही सुरू आहे. |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ चे कलम ७ प्रमाणे |
| आरोपीचे नाव व कार्यालय | **नरेशकुमार तुकाराम बहिरम, तहसिलदार, नाशिक** |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | १५,००,०००/- रुपये |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | १५,००,०००/- रुपये |
| थोडक्यात माहिती | यातील तक्रारदार यांना कायदेशीर कारवाईकामी अधिकारपत्र प्राप्त असलेल्या जमीन मालक यांचे जमिनीमध्ये मुरूम उत्खनाचे मुल्य नियमानुसार पाच पट दंड आकारणी बाबत उपविभागीय अधिकारी, नाशिक यांचे कडील अपीलात आदेश होवुन सदरचे प्रकरण पुनश्च फेर चौकशी करीता आलोसे **नरेशकुमार तुकाराम बहिरम, तहसिलदार, नाशिक** यांच्या कडे पाठविण्यात आले होते. आलोसे यांनी स्थळनिरीक्षण करीता बोलावले त्यावेळी आलोसे यांनी तक्रारदार यांचे कडे १५,००,०००/- रु.लाचेची मागणी केल्याने तक्रारदार यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक कार्यालयात तक्रार दिली.<br>सदर तक्रारीवरुन ला.प्र.वि. नाशिक पथकाने पडताळणी करून सापळा आयोजित केला असता सापळा कारवाई दरम्यान आलोसे **नरेशकुमार तुकाराम बहिरम, तहसिलदार, नाशिक** यांनी तक्रारदार यांचे कडे १५,००,०००/- रु.लाचेची मागणी करून सदर लाचेची रक्कम दि.०५.०८.२०२३ रोजी आलोसे यांचे कर्मयोगी नगर येथील राहते घराचे अपार्टमेटचे पार्कीगमध्ये स्विकारल्याने त्यांना पकडण्यात आले असुन त्यांचेविरुध्द भ्र.प्र. का.सन १९८८ चे कलम ७ प्रमाणे गुन्हा नोंदविण्याची पुढील कार्यवाही सुरू आहे. |

लाचलुचपत विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक परिक्षेत्र, नाशिक येथे संपर्क करावा.


संपर्क पत्ता :- ला.प्र.वि. नाशिक परिक्षेत्र, नाशिक
संकेतस्थळ :- acbmaharashtra.gov.in
ई-मेल :- spacbnashik@mahapolice.gov.in
ऑनलाईन तक्रार :- acbmaharashtra.net
टोल फ्री क्रमांक :- १०६४
दुरध्वनी क्रमांक :- ०२५३-२५७५६२८, २५७८२३०
व्हॉट्स ॲपक्र :- ९९३०९९७७००


पोलीस उपआयुक्त / पोलीस अधिक्षक ... नाशिक परिक्षेत्र, नाशिक

(नरेंद्र भा. पवार)
पोलीस उप अधीक्षक,
लाचलुचपत प्रतिबधक विभाग, नाशिक